## अधिसूचना

## जिल्हाधिकारी, यांचेकडून

**(महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६)**

**क्रमांक :- २०१६/भूसंपादन/कार्या-१/एस.आर.११/२०१६/**आरआर २८०२ दि. २१/१२/२०१६

ज्याअर्थी, बार्शी नगरपालिकेची विकास योजना (दुसरी सुधारित) (यापुढे "उक्त विकास योजना/ सुधारित विकास योजना" म्हणून संबोधिलेली) शासनाने नगर विकास विभागाची अधिसूचना क्र.टिपीएस/१७००/५८४/प्र.क्र.२८/२०००, दि.०२/०२/२००२ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३१ पोटकलम (१) अन्वये (यापूढे उक्त महाराष्ट्र अधिनियम म्हणून संबोधिलेला) मंजूर केली असून ती दि.२८/१०/२००४ पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, सोबतच्या अनुसूचीत नमूद केलेली जमिन (यापुढे "उक्त जमिन" म्हणून संबोधिलेली) उक्त सुधारित विकास योजनेत नगरपरिषद कार्यालय ते कोठारी इमारत पर्यंत, १२.०० मी.विकास योजना रस्ता या प्रस्तावाने बाधित होत आहे. ( यापुढे "उक्त सार्वजनिक प्रस्ताव" म्हणून संबोधिलेला)

आणि ज्याअर्थी, बार्शी नगरपालिकेने ( यापुढे उक्त नगरपालिका म्हणून संबोधिलेली ) उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ पोटकलम (१) अन्वये उक्त जमिन उक्त सार्वजनिक प्रस्तावासाठी संपादन करणेबाबत शासनाकडे अर्ज केला आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी, उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १५१ पोटकलम (१) खाली काढलेल्या अधिसूचना क्र.टीपीएस/२१७५/५१०६/युडी-७, दि.३.०३.१९७९ अन्वये मंजूर विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी निर्दिष्टित करण्यात आलेल्या जमिनी बाबतच्या उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ पोट कलम (१) (२) व (४) खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती जिल्हाधिका-यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिन उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२५ मधील तरतुदीनुसार उक्त सार्वजनिक प्रस्तावासाठी आवश्यक असल्याबाबतची जिल्हाधिकारी, सोलापूर, यांची खात्री झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या संपादनापोटी दयावयाच्या नुकसान भरपाईची रक्कम संपूर्णपणे उक्त नगरपालिकेने अदा करावयाची आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ पोट कलम (२) मध्ये निर्दिष्टित केलेली कालमर्यादा उलटून गेलेली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना (तिसरी सुधारणा) अधिनियम २०१५ च्या नियम ५(दोन) नुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनीचे संपादन करताना भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यापूढे उक्त संपादन अधिनियम म्हणून संबोधिलेला) मधील कलम ४ ते १५ (दोन्हीं सह) ला सूट दिली आहे. सदरचा अधिनियम महाराष्ट्र शासन राजपत्रात असाधारण क्र.७१, दि.३१ डिसेंबर २०१५ रोजी प्रसिध्द झालेला आहे, आणि म्हणून उक्त संपादन अधिनियमाच्या कलम १९ च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे सरळ याव्दारे घोषित करण्यात येत आहे.